महाराष्ट्र शासन

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णूपुरी,नांदेड

DR.SHANKARRAO CHAVAN GOVT.MEDICAL COLLEGE , VISHNUPURI, NANDED.
Dean Chember - (02462) 229275 Fax No. 02462 – 229336 E-mail "gmcnanded @ rediff mail.com."

जा.क्र.डॉशंचशावैमविनां/आस्था१/जाहिरातीची सूचना/ 10639 /२०२६ दि.27/११/ २०२६

महत्त्वाची सूचना

विषय:- आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई यांच्या अधिपत्याखालील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथील चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबतची जाहिरात सुधारित करण्याकरिता सदरील जाहिरात तात्पुरती रद्द करण्यात येत असल्याबाबत.

संदर्भ:-१.या कार्यालयाचे जा.क्र.डॉशंचशावैमविनां/आस्था-१/जाहिरात-प्रसिध्दी/अध्यापक/चिकित्सा व अचिकित्सा/ ९६५५/२०२६, दि.३१.१०.२०२६

२. महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई शासन आदेश क्रमाक :-ई-१९३६२२८/ वैसेवा-३, दिनांक २३.११.२०२६.

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ अन्वये आयुक्तालय, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई यांच्या अधिपत्याखालील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथील चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्त्वावर ३६४ दिवसांकरिता तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबतची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

संदर्भ क्र.२ च्या शासन आदेशान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, संलग्नित रुग्णालये व इतर संस्थामधील तात्पुरत्या, करार नियुक्त्यांमध्ये आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) यांच्या कलम ३(१) नुसार, अतिविशेषीकृत पदे, बदली अथवा प्रतिनियुक्तीने भरावयाची पदे, पंचेचाळीस दिवसांपेक्षा कमी कालावधीच्या तात्पुरत्या नियुक्त्या व एकल पद वगळता लोकसेवांमधील व पदांवारील सर्व नियुक्त्यांना सदर अधिनियम लागू होतो. त्यामुळे सर्व संवर्गातील पदांवर पंचेचाळीस दिवस किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी करण्यात येणाऱ्या सर्व तात्पुरत्या, करार नियुक्त्यांना सदर अधिनियम, महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या आरक्षणाबाबतचे तसेच समांतर आरक्षणाबाबतचे शासनाचे प्रचलित आदेश लागू आहेत.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र.१ व २ नुसार चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबतची जाहिरात सुधारित करण्याकरिता सदरील जाहिरात तात्पुरती रद्द करण्यात येत आहे व तसेच सुधारित जाहिरत आरक्षणानुसार प्रसिध्द करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णूपुरी,नांदेड.

प्रत- मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

~~प्रत-~~ डॉ. इस्माईल फारुखअली इनामदार, सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख, जनऔषधवैद्यकशास्त्र विभाग, डॉ.शं.च.शा.वै.म.विष्णूपूरी, नांदेड यांनी तात्काळ सदरची सूचना महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.